


दैनिक **आकर्षण**

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ । अंक १५९ । मंगळवार १० मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# प्रभाग १७ मध्ये महिनाभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत, नगरसेवकांचा आंदोलनाचा इशारा

## नगरसेवक मयूर बांगरे यांच्यासह नगरसेवकांचे आयुक्तांना निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रभाग १७ मध्ये मागील एक महिन्यापासुन पाणी पुरवठा व्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे,. येत्या आठ दिवसात त्यात सुधारणा न झाल्यास आयुक्तांच्या दालनासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा नगरसेवक मयूर बांगरे यांच्यासह या प्रभागाच्या नगरसेवकांनी दिला आहे. ■ पान ४ वर

### वॉटर माफियांचे खिसे गरम करण्याचे काम?

**अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील सर्व जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी चर्चा केली असता मुळा डॅममधून येणारे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असून संपूर्ण उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता कमीच आहे असे समजले. तरी सुद्धा शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करुन मनपा प्रशासन खाजगी टेंकर व्यवसायिक आणि वॉटर माफियांचे खिसे गरम करण्याचे काम करत आहे का ? असा संशय निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.**

# जबरी चोऱ्या करणारा भोऱ्या अखेर जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नगर तालुका हद्दीत कोयत्याचा धाक दाखवून जबरी चोऱ्या करणारा भोऱ्या यास जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे.

एमआयडीसी प्रभारी अधिकारी सपोनि माणिक चौधरी यांना गोपनीय माहिती मिळाली की, भोऱ्या उर्फ विठ्ठल नवनाथ काळे (वय- १८ वर्ष, रा. बोल्हेगाव ता. जि. अहिल्यानगर) हा निमगाव घाना (ता. जि. अहिल्यानगर येथे लपून बसलेला आहे. त्यानुसार सपोनि माणिक चौधरी यांनी तात्काळ तपासपथकास निमगाव घाना येथे रवाना केले. तपास पथकातील अंमलदार निमगाव घाना येथे सापळा रचून भोऱ्या यास त्याच्या मामाचे शेतात लपून बसलेला असताना शिताफीने पकडले. आरोपी भोऱ्या हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर नगर तालुका पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, सपोनि माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई मनोज मोंढे, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ सचिन आडबल, पोहेकॉ संदीप पवार, पोहेकॉ सुद्रीक, पोकॉ/नवनाथ दहिफळे, पोकों अक्षय रोहोकले, पोकॉ ज्ञानेश्वर आघाव, पोकों जयसिंग शिंदे, पोकॉ राहुल गुंडु यांच्या पथकाने केली.

# नेवासा नगरपंचायतीत उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांचा सत्कार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी अॅड. धनंजय जाधव यांची निवड झाल्याबद्दल नेवासा नगरपंचायत येथे त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंग घुले यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी निवड झाल्याबद्दल विविध स्तरांतून अॅड. धनंजय जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या निवडीमुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नेवासा नगरपंचायतीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंग घुले यांनी आपल्या मनोगतातून अॅड. धनंजय जाधव यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करत, उपमहापौर म्हणून ते शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला. तसेच त्यांच्या कार्यकाळात अहिल्यानगर शहराच्या विकासाला गती मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

■ पान ४ वर

# नाथषष्ठी यात्रोत्सवाला प्रारंभ; पैठणमध्ये पाच लाख भाविकांची गर्दी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी यात्रोत्सवाला पैठणमध्ये आज भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. यात्रेच्या पहिल्याच दिवशी सुमारे सहा लाख भाविकांनी पैठणमध्ये हजेरी लावल्याने शहर आणि गोदावरी काठ परिसर वारकऱ्यांनी फुलून गेला.

राज्याच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे ७०० पायी दिंड्या पैठणमध्ये दाखल झाल्या असून अनेक वारकरी गोदावरी काठावरील वाळवंट परिसरात मुक्कामी थांबले आहेत. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''भानुदास एकनाथ'' ■ पान ४ वर

# ड्रग्स माफियांविरोधात आमदार काशिनाथ दाते यांचा विधानसभेत बुलंद आवाज

## एमडी (मॅफेड्रोन) तस्करी प्रकरणावर अधिवेशनात लक्षवेधी प्रश्न; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सविस्तर उत्तर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी राज्याच्या अधिवेशनात पुन्हा एकदा जनतेच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय सभागृहात मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले. राज्यात विशेषतः पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मॅफेड्रोन (एमडी) या अंमली पदार्थाच्या वाढत्या तस्करीबाबत त्यांनी तारांकीत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती सभागृहात दिली.




आमदार दाते यांनी विचारलेल्या प्रश्नात पुणे जिल्ह्यातील शिरूर तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदे व पारनेर परिसरात एमडी या अंमली पदार्थाची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. विशेष म्हणजे या प्रकरणात काही पोलिस कर्मचारीही सहभागी असल्याचे तपासातून समोर आले असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित करून शासनाने यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर देताना सांगितले की, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी शिरूर परिसरात ■ पान ४ वर

**पारनेर नगर मतदारसंघासाठी बजेटच्या माध्यमातून ४१ कोटी रुपयांचा विकासनिधी उपलब्ध झाला आहे, जनतेच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्नही विधानसभेत प्रभावीपणे मांडुन, विकासकामांसोबतच समाजातील तरुण पिढीला ड्रग्जच्या विळख्यातून वाचविण्याचा ठाम प्रयत्न सातत्याने करत आहे, तपासादरम्यान आणखी मोठा साठा उघडकीस आला असून पारनेर तालुक्यातील कुरुंद येथे ९ किलो ६५५ ग्रॅम वजनाचा सुमारे १९ कोटी ३१ लाख रुपये किमतीचा एमडी अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथे कार्यरत असलेल्या एका पोलीस हेड कॉन्स्टेबलचा सहभागही निष्पन्न झाला आहे.**

**आ. काशिनाथ दाते सर,** (विधानसभा सदस्य)



## दै. आकर्षण निवडक

### अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सचिवपदी प्रा. मधुसूदन मुळे




अहिल्यानगर - येथील सामाजिक कार्यकर्ते व ब्राह्मण समाजातील ज्येष्ठ नागरिक प्रा. मधुसूदन मुळे यांची अखिल तीन वर्षांसाठी भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सचिवपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी या आशयाचे पत्र प्रा. मुळे यांना नुकतेच दिले आहे. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वाढीसाठी तसेच या महासंघाकडून नगरमध्ये मोठे उपक्रम घेण्याच्या दृष्टीने आपण आपल्या सचिवपदाच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे प्रयत्न करू, असे नियुक्तीनंतर बोलताना प्रा. मुळे यांनी सांगितले.

### अहिल्यानगरच्या श्रद्धा व्यापारी यशस्वी; सीए परीक्षेत उत्तीर्ण



अहिल्यानगर- इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया() यांच्या जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत अहिल्यानगर येथील श्रद्धा राजेंद्र व्यापारी यांनी यश संपादन करत परीक्षा उत्तीर्ण केली आहे. श्रद्धा या अहिल्यानगर महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र व्यापारी यांची कन्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीयांसह मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.या यशासाठी त्यांना सीए राजेंद्र काळे आणि सीए पुनीत व्होरा यांचे मार्गदर्शन लाभले.

### माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण आणि पोलीसमित्र अहिल्यानगर संघटनेची कार्यकारिणी जाहीर



अहिल्यानगर - माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण आणि पोलीसमित्र समिती चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांनी अहिल्यानगर येथील समितीची नियुक्ती जाहीर केली. यावेळी माहिती अधिकार,पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र अहिल्यानगर जिल्हा संघटनेच्या अध्यक्षपदी प्रा.संजय साठे, उपाध्यक्षपदी सुभाष कोरडे, कार्याध्यक्षपदी सचिन शेजुळ, सर सचिवपदी प्रा.साईनाथ थोरात,सहसचिव पदी ओंकार वाघमारे,उप कार्याध्यक्षपदी शिवाजीराव कापसे व कोषाध्यक्षपदी गणेश महाजन यांची निवड करण्यात आली आहे.यांना निवडीचे पत्र महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांनी नुकतेच प्रदान केले.व सर्वांचे अभिनंदन केले. माहिती अधिकार आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असतांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवत माहिती अधिकार आणि पत्रकारितेची चळवळ सक्षम आणि सशक्त करण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या मार्गदर्शनात आणि सहमतीने तसेच राष्ट्राची लोकशाहीची विचारधारा यशस्वी करण्यासाठी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीची ध्येयधोरणे लोकशाही भारताच्या शाश्वत विकासासाठी राबवण्याची जबाबदारी आपणावर सोपवत आहोत. अशी माहिती महाराष्ट्र राज्य माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांनी दिली.

# शिशु संगोपन संस्थेत जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षक-कर्मचाऱ्यांचा सन्मान

## समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अनमोल – दिलीप गुंदेचा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिशु संगोपन संस्था येथे पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा संस्था चे विश्वस्त राजेंद्र चोपडा यांच्या वतीने महिला शिक्षक व कर्मचाऱ्यांना साडी, श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी सर्व महिला शिक्षकांना महिला दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, शिक्षण क्षेत्रात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महिला शिक्षकांची भूमिका आईसारखी असते. समाज घडविण्याचे मोठे काम शिक्षिका करत असून त्यांचा सन्मान करणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे.

यावेळी पुढे बोलताना गुंदेचा यांनी सांगितले की, महिलांना संधी मिळाल्यास त्या प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करतात. शिक्षणसंस्थांमधील महिला शिक्षक केवळ अध्यापन करत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचेही कार्य करतात. त्यामुळे महिलांच्या कार्याचा गौरव करणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात संस्थेचे खजिनदार श्री. मुनोत यांनी आपल्या भाषणात महिला दिनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, महिला सशक्तीकरण हा केवळ घोषवाक्य नसून तो प्रत्यक्ष कृतीतून साकार झाला पाहिजे. आज महिला शिक्षण, प्रशासन, उद्योग, विज्ञान अशा सर्व क्षेत्रांत पुढे येत आहेत. समाजातील प्रगतीसाठी महिलांचे शिक्षण आणि स्वावलंबन अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेच्या विश्वस्त सौ. रश्मी येवलेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिलांनी स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून पुढे जायला हवे. शिक्षण क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार आणि सकारात्मक विचार रुजविण्याची जबाबदारी महिला शिक्षक पार पाडत आहेत. अशा सन्मान कार्यक्रमांमुळे महिलांना अधिक प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

विश्वस्त राजेंद्र चोपडा यांनीही यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेच्या प्रगतीत महिला शिक्षक व कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या कष्ट, समर्पण आणि जिद्दीमुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक मजबूत होत आहे. महिला दिनानिमित्त त्यांचा सन्मान करणे ही संस्थेसाठी गौरवाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

# समर्पित नेतृत्वाचे उदाहरण म्हणजे नीलेश लंके

## खासदार नीलेश लंके यांच्या कार्याचा राजेश टोपे यांच्याकडून गौरव । पारनेर येथे महाआरोग्ययज्ञ शिबिराचे उद्घाटन । आरोग्य, शिक्षण आणि जनसेवेवर भर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** स्वतःचा वाढदिवस साजरा करण्याऐवजी तो जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित करण्याची भावना खासदार नीलेश लंके यांच्यात आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या नेत्यांचे उदाहरण म्हणजे नीलेश लंके होय. सरपंच पदापासून खासदारपदापर्यंतचा प्रवास करताना त्यांनी जनतेचा जो विश्वास संपादन केला, ते सर्वसाधारण काम नाही. लोकांप्रती प्रेमभावना, अथक परिश्रम आणि लोकाभिमुखता या गुणांमुळे पारनेरकरांनी त्यांना जपले आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी काढले.

खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच खासदार शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणि माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नीलेश लंके प्रतिष्ठान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि आपला मावळा संघटनेच्या वतीने पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात आयोजित 'महाआरोग्ययज्ञ' आरोग्य शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री टोपे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला खासदार नीलेश लंके, खासदार भास्कर भगरे, ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक किरण जाधव, डॉ. प्रकाश कांबळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश लोंढे, प्रकाश लाळगे, स्किल हबच्या संचालिका अश्विनी शिंदे, आशिष शिंदे, संदीप वर्पे, राणीताई लंके, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, ज्ञानदेव लंके, मारुती रेपाळे, किसनराव रासकर, संभाजी रोहोकले, बाबाजी तरटे, सतीश भालेकर, अर्जुन भालेकर, कारभारी पोटघन मेजर, डॉ. बाळासाहेब कावरे, ॲड. राहुल झावरे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन जितेश सरडे, अमोल यादव आणि बाजीराव कारखिले यांनी केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री टोपे म्हणाले की, खासदार नीलेश लंके यांना केवळ पारनेर किंवा जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रभर मागणी आहे. कारण ते सामान्यांची भाषा बोलतात. काही जण पुस्तके वाचतात, तर नीलेश लंके यांनी माणसे वाचली आहेत. त्यांचा मित्रपरिवार मोठा असून त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड आत्मीयता आहे. नेत्यासाठी जीव ओवाळून टाकणारे सहकारी असणारे नेते फार कमी असतात. त्यात खा. लंके यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल, असेही टोपे यांनी नमूद केले.

सध्या हृदयरोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हृदयविकाराचा झटका आल्यास त्वरित सीपीआर देणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे नीलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना सीपीआरचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. अशा प्रशिक्षणामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे आवाहन टोपे यांनी केले.



**अहिल्यानगर गणेश चौक सिव्हिल हाडको येथील रजा ऑटो मोटर्स येथे लहान मोठे सर्व प्रकाराची वाहन पार्किंगसाठी जमा केले जातात यांच्या माध्यमातून रजा ऑटो मोटर्स चे संचालक सय्यद साबीर अली मन्सुर अली यांना २०२६ या गोल्डन प्राईजने बेस्ट ऑफ मॅनेजमेंट महाराष्ट्रातुन नंबर १ गोल्ड मेडल देऊन महिंद्र कंपनी विभागाचे जावेद पटेल यांच्या हस्ते अहिल्यानगर येथे येऊन सन्मानित करण्यात आले.**

# महिला दिन हा एक दिवस नाही तर वर्षातील ३६५ दिवस साजरा व्हायला हवा – आशाताई डोके

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त बाल आनंद मेळावा व विविध उपक्रमांचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरात निर्मलनगर येथील डोके विद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिलांच्या सन्मानाबरोबरच किशोरवयीन मुलींमध्ये स्वावलंबनाची जाणीव निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या आशाताई डोके यांनी महिला सक्षमीकरणावर प्रभावी मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी 'बाल आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मेळाव्यात मुलींनी स्वावलंबन कसे प्राप्त करावे, व्यवसाय कसा करावा याबाबत प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. 'कमवा आणि शिका' या



संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून खरेदी-विक्री, नफा-तोटा, लहान व्यवसायाचे नियोजन याबाबत माहिती देण्यात आली.

या उपक्रमाच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींना आर्थिक व्यवहाराचे प्राथमिक ज्ञान मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यात स्वावलंबी होण्यासाठी प्रेरणा मिळावी हा उद्देश होता. तसेच विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे याची माहिती देण्यात आली.आशाताई डोके यांनी सांगितले की, महिला दिन हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षातील प्रत्येक दिवस महिलांचा सन्मान करणारा असावा. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून शिक्षण, आरोग्य, उद्योग, सामाजिक कार्य अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी मोठे योगदान दिले आहे. त्या पुढे म्हणाल्या की, आजच्या काळात मुलींनी आत्मनिर्भर होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाबरोबरच आर्थिक व्यवहाराची समज, व्यवसायाची ओळख आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. अशा प्रकारचे उपक्रम मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करतात आणि त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनवतात.

मुख्याध्यापिका क्षेत्रे मॅडम यांनी आपल्या भाषणात महिलांनीच महिलांचा सन्मान करणे, एकमेकांना समजून घेणे व परस्पर आदर ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी सुप्रिया वाळके यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात अभिषेक खामकर, किरण जाधव उपस्थित होते. शेवटी बाल आनंद मेळाव्याचे आशादेवी डोके यांनी विशेष कौतुक केले व कार्यक्रमात सहभागी सर्वांचा सत्कार करण्यात आला.

# प्रयास दादी–नानी ग्रुपकडून महिला दिन उत्साहात; वेशभूषा स्पर्धेतून स्त्री शक्तीचा जागर

## विविध खेळ, स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांनी महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रयास दादी–नानी ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या कार्य–कर्तृत्वाचा जागर करणारा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात थोर व कर्तृत्ववान महिलांवर आधारित वेशभूषा स्पर्धा, विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांच्या स्पर्धा तसेच सांस्कृतिक सादरीकरणांचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने महिलांनी उत्साहाने सहभाग घेत स्त्री शक्तीचे प्रभावी दर्शन घडविले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून भारती सुधीर पाटील, हेमा सारडा, नवनिर्वाचित नगरसेविका संध्या पवार, गौरी बोरकर, माजी नगरसेविका मंगल गुंदेचा, रेणुका शर्मा, सुजाता कदम, शोभा लुनिया, राजश्री शितोळे उपस्थित होत्या. तसेच प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी, सल्लागार विद्या बडवे, संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, खजिनदार मेघना मुनोत, उपाध्यक्ष ज्योती गांधी, सचिव उज्वला बोगावत यांच्यासह अरुणा गोयल, सुचेता बोरकर, छाया भंडारी, सुशीला त्र्यंबके, उषा सोनी, शकुंतला जाधव, अलका वाघ, सुरेखा जंगम, लीला अग्रवाल, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, शशिकला झरेकर, जयश्री पुरोहित, प्रतिभा पेंडसे, आरती वाडेकर, आशा गायकवाड, कविता शिंगवी, मिनाक्षी पाठक आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिला सक्षमीकरणासाठी प्रयास ग्रुपचे सातत्यपूर्ण कार्य

प्रास्ताविक करताना संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा यांनी प्रयास ग्रुपच्या कार्याचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, मागील अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने प्रयास ग्रुप कार्यरत आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास वाढावा, त्यांचे आरोग्य चांगले राहावे तसेच त्यांच्यातील कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. आज अनेक महिला या ग्रुपशी जोडल्या गेल्या असून, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात त्या सक्रिय भूमिका बजावत आहेत.

प्रमुख पाहुण्या भारती सुधीर पाटील यांनी आपल्या भाषणात महिलांना प्रेरणा देताना सांगितले की, प्रत्येकाने वास्तव जीवन जगत असताना मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस ठेवले पाहिजे. स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतीही गोष्ट अशक्य राहत नाही. महिलांमध्ये अपार क्षमता आहे. कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीत महिलांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांना योग्य संधी मिळाल्यास त्या मोठे यश मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले.

हेमा सारडा यांनी मुलगा–मुलगी भेदभावाबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजाने आता हा भेद पूर्णपणे विसरून समानतेची भूमिका स्वीकारली पाहिजे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास अनेक चांगल्या गोष्टी साध्य होऊ शकतात. मोबाईलचे फायदे आणि तोटे समजून घेऊन त्याचा सकारात्मक उपयोग केला तर शिक्षण, व्यवसाय आणि दैनंदिन जीवनात मोठी प्रगती करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पैठण येथे नाथषष्ठी सोहळ्यास नगरप्रदक्षिणेने प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण नगरीत ४२७ व्या नाथषष्ठी उत्सव सोहळ्याच्या मुख्य तीन दिवसीय कार्यक्रमांना सोमवार (दि.९) पासून उत्साहात प्रारंभ झाला. भल्या पहाटे यात्रेत सहभागी झालेल्या पाचशेहून अधिक दिंड्यांमधील भाविकांनी नाथसागर व वाळवंटातील गोदावरी पात्रात स्नान करून नगरप्रदक्षिणेला सुरुवात केली.



''अधिष्ठान जेथे प्रतिष्ठान देखा
तिथे जन्मला तो गुणातीत एका,
नमस्कार माझा सदगुरु एकनाथा!''

नाथसागर परिसरातील पर्यटक चौकातील संतपीठ, नाराळा, दक्षिण काशी मैदान, नवीन कावसन, यशवंतनगर, लक्ष्मीनगर, साळीवाडा, पावरहाऊस परिसर, नागघाट, रंगारहट्टी घाट, वाळवंट परिसर, संतनगर आदी भागांतून दिंड्या गावातील नाथ मंदिरात दर्शनासाठी निघाल्या. ''भानुदास-एकनाथ''च्या गजरात तल्लीन होऊन नाचत-गात दिंड्यांनी नगरप्रदक्षिणा केली.

दुपारी गावातील नाथ मंदिरातून नाथ वंशस्थांसह मानाच्या दिंड्याही मार्गस्थ झाल्या. बाहेरगावाहून आलेल्या दिंड्यांची नगरप्रदक्षिणा मध्यरात्रीपर्यंत सुरू राहते. विविध दिंडी फडांवर कीर्तन, भजन व भारुडांच्या माध्यमातून संत परंपरेचा संदेश देण्यात आला.

परंपरेनुसार संत एकनाथ महाराज यांनी फाल्गुन वद्य षष्ठी, सन १५९९ रोजी पैठणच्या कृष्णकमल तीर्थावर दुपारी १२ वाजता गोदावरी नदी मध्ये जलसमाधी घेतली होती. त्या स्मृतीप्रित्यर्थ संत-महंतांनी नाथांच्या जलसमाधी प्रसंगावर कीर्तन सादर केले. ही कीर्तने ऐकण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

फाल्गुन वद्य षष्ठीच्या मध्यरात्रीनंतर गावातील नाथ मंदिरात पुरोहितांच्या मंत्रघोषात विजयी पांडुरंगाचा महाभिषेक करण्यात आला.

सकाळच्या सत्रात बाहेरील नाथ मंदिरातील नाथसमाधी पादुकांचा महाभिषेक जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी सपत्नीक केला.

**क्षणचित्रे**

नगरप्रदक्षिणेसाठी निघालेल्या दिंड्यांवर ठिकठिकाणी पैठणकरांकडून पुष्पवृष्टी करण्यात आली.

''भानुदास-एकनाथ''च्या गजरात भाविक तल्लीन होऊन नाचत होते.

सामाजिक संस्थांकडून वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वारकऱ्यांना सहकार्य करण्यात व्यस्त होते.

बसेस व अन्य वाहनांची योग्य व्यवस्था असल्याने भाविकांची ये-जा सुरळीत सुरू होती.

पोलीस प्रशासनाने वाहतूक व्यवस्था चांगल्या पद्धतीने हाताळल्याचे दिसून आले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### दिल्लीगेट येथील शनि मंदिरात शनिवारी हनुमान चालीसा

अहिल्यानगर - सर्जेपुरा येथील श्री दक्षिणमुखी



हनुमान मंदिर मंडळाच्यावतीने शनिवारी (दि.११) रात्री ८.३० वाजता दिल्लीगेट येथील शनि मारूती मंदिरात हनुमान चालिसा व भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी मंदिरात दिल्लीगेट येथील शनि मंदिरात हनुमान चालिसाचे आयोजन करण्यात येते. त्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. याहीवर्षी मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून हनुमान चालीसा व भजन संध्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त 'संत तुकोबांची दख्खनी परंपरा' विषयावर विशेष व्याख्यान

अहिल्यानगर- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त शहरात एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण व्यासपीठ आणि न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता न्यू आर्ट्स कॉलेजच्या शाहू महाराज ऑडिटोरियममध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात आयआयटी कानपूर येथील प्राध्यापक डॉ. समीर चव्हाण 'संत तुकोबांची दख्खनी परंपरा' या विषयावर सखोल व्याख्यान देणार आहेत. यशवंतराव चव्हाण व्यासपीठाचे अध्यक्ष तथा माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी या कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले की, संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी तसेच साहित्यप्रेमी नागरिक व विद्यार्थ्यांसाठी ही एक अनोखी वैचारिक मेजवानी ठरणार आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. आयआयटी कानपूरसारख्या देशातील सर्वो च्च तंत्रज्ञान संस्थेत गणित आणि सांख्यिकी यांसारख्या विज्ञाननिष्ठ विषयांचे प्राध्यापक असलेले डॉ. समीर चव्हाण यांनी मराठी संत साहित्यावर विशेषतः संत तुकाराम महाराजांच्या साहित्यावर अत्यंत सखोल संशोधन केले आहे. विज्ञानाच्या अभ्यासाबरोबरच संत साहित्याचा त्यांनी घेतलेला व्यापक वेध अनेकांना आश्चर्यचकित करणारा ठरला आहे. 'अखई ते जालें : तुकाराम : हिंदुस्तानी परिवेशात' हा त्यांचा बहुचर्चित ग्रंथ राज्य शासनाच्या पुरस्काराने गौरविण्यात आला आहे. या ग्रंथातून त्यांनी संत तुकारामांच्या साहित्याचा विचार केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण भारतीय आणि दख्खनी सांस्कृतिक संदर्भातून केला आहे. तत्कालीन हिंदुस्तानी समाजजीवन, भाषिक परंपरा आणि सांस्कृतिक वातावरणात संत तुकारामांचे स्थान काय होते, याचा त्यांनी अभ्यासपूर्ण उलगडा केला आहे. गुरुवारी होणाऱ्या व्याख्यानातही डॉ. चव्हाण 'दख्खनी परंपरा' या दृष्टिकोनातून संत तुकोबारायांच्या विचारांचे आणि साहित्याचे विश्लेषण करणार असून, त्यांच्या अभंगांमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक संदर्भांवर नवे प्रकाश टाकणार आहेत.स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना साहित्य, संस्कृती आणि वैचारिक चर्चांबद्दल विशेष जिव्हाळा होता.

### कमल शंकर कडेकर यांचे निधन

अहिल्यानगर- श्याम कडेकर ( गॅस रिपेरिंग



वाला ) यांच्या मातोश्री कमल शंकर कडेकर यांचं ०९/०३/२०२६ रोजी निधन झाले वय ७८ राहणार आलमगीर मोहनबाग जवळ फुलारी टॉवर त्यांच्या पश्यात एक मुलगा सून आणि नातवंड परिवार हे श्याम गॅस वाले पानसरे गल्लीत गवळी वाडा येथे ते पूर्वी राहत होते अहिल्यानगर मध्ये श्याम व त्याची आई गॅस वाले म्हणून प्रसिद्ध आहे, आजार पणामुळे त्यांचं दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो ओम शांती दशक्रिया बुधवार दि १८/०३/२०२६ रोजी सकाळी ८ वाजता भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर जवळ अमरधाम येथे होईल.

# मांजरसुंभा गड येथे ११ हजार १११ हनुमान चालीसांचे प्रकाशन

**| गुरुवर्य महंत रामगिरी महाराजांची उपस्थिती; जागतिक पर्यावरण विकास सरकार संस्थेचा पुढाकार**
**| १ कोटी ११ लाख ११ हजार १११ भक्तांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील मांजरसुंभा गड येथे गुरु गोरक्षनाथ मंदिराचा कलशारोहण सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त जागतिक पर्यावरण विकास सरकार या संस्थेच्या माध्यमातून ११ हजार १११ प्रती हनुमान चालीसांचे प्रकाशन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जागृती यांचा संगम घडवून आणणारा कार्यक्रम पार पडला.

गुरुवर्य महंत रामगिरी महाराज (सरला बेट गोधाधाम) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा धार्मिक सोहळा पार पडला. तसेच गोरक्षनाथ मठाचे महंत रोहतकदास महाराज (गोरखपूर, उत्तर प्रदेश) यांचीही कार्यक्रमाला उपस्थिती लाभली. मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यानंतर हनुमान चालीसांचे विधिवत प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला शंकरराव कदम, जयराम कदम, गोरक्षनाथ कदम, मारुती कदम, जालिंदर कदम, तुकाराम कदम, आसाराम कदम, भाऊसाहेब कदम, भास्कर कदम, नारायण कदम, विलास भुतकर, पोपटराव पटारे, निलेश साठे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी जागतिक पर्यावरण विकास सरकार संस्थेचे अध्यक्ष गोरक्षनाथ गवते यांनी बोलताना सांगितले की, समाजात आध्यात्मिकतेसोबत सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. यासाठी १ कोटी ११ लाख ११ हजार १११ श्रीराम व हनुमान भक्तांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प संस्थेने केला आहे. प्रत्येक घरामध्ये दिवसातून किमान एकदा तरी हनुमान चालीसा पठण व्हावे, यासाठी जनजागृती अभियान राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. धार्मिक साधनेतून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन समाजजीवन अधिक सुदृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याचे नमूद करताना गवते म्हणाले, ''आज झाडे वाचली तर सजीव सृष्टी वाचेल आणि सजीव सृष्टी वाचली तर पर्यावरण टिकेल.'' या उद्देशाने संस्थेमार्फत ''एक झाड एक विद्यार्थी, एक झाड एक व्यक्ती'' ही संकल्पना राबविली जात आहे. यासोबतच समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी कुऱ्हाडबंदी, डीजे बंदी, हुंडाबंदी, लोटाबंदी, आकडाबंदी, खाजगी सावकारबंदी, व्यसनबंदी, तंटाबंदी, शिकारबंदी, प्लास्टिकबंदी, भ्रष्टाचारबंदी आणि बेरोजगारीबंदी अशा विविध मोहिमा राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, विषमुक्त शेती, रोगमुक्त भारत, भू-प्रदूषणबंदी, जलप्रदूषणबंदी आणि वायूप्रदूषणबंदी या उपक्रमांद्वारे स्वच्छ, सुंदर आणि निरोगी भारत घडविण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**वीर फकिरा युवा प्रतिष्ठान, सिद्धार्थनगर यांच्या वतीने**

# उपमहापौर धनंजय जाधव यांचा सत्कार



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वीर फकिरा युवा प्रतिष्ठान, सिद्धार्थनगर अहिल्यानगरच्या वतीने अहिल्यानगरचे उपमहापौर मा.श्री.धनंजय भैय्या जाधव यांचा सत्कार एका वेगळ्या आणि ऐतिहासिक पद्धतीने करण्यात आला. क्रांतिगुरुवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या पराक्रमाची आठवण करून देणारा पेहराव देऊन हा सन्मान पार पडला. यावेळी भैय्याना: खांद्यावर मानाची घोंगडी टाकून, ✻ मस्तकी राजेशाही फेटा बांधून, ✻ आणि लोकशाहीर आण्णाभाऊ साठे साहित्यातील अनमोल ठेवा असलेली फकिरा कादंबरी भेट देऊन अभिवादन करण्यात आले. आपली संस्कृती आणि महापुरुषांचे विचार जपणारा हा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

# कॉम्प्युटर डिप्लोमा विभागात वेब डेव्हलपमेंट विषयावर तज्ज्ञ व्याख्यान

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** १० मार्च रोजी कॉम्प्युटर डिप्लोमा विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी Web Development या विषयावर तज्ज्ञ व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून रोहित काळेबग सर thinkify Softwtware Services उपस्थित होते.

या व्याख्यानामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, आवश्यक कौशल्ये तसेच या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष प्रोजेक्ट आणि प्रॅक्टिकल ज्ञानाला अधिक महत्त्व द्यावे, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना करिअरविषयी उपयुक्त माहिती मिळाली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे सर, उपप्राचार्य प्रा. प्रवीण नागरगोजे सर, कॉम्प्युटर विभाग प्रमुख प्रा. महेश मरकड तसेच प्रा.संदीप बोराळे, प्रा.जगदीश दळे, प्रा.ऋषिकेश नाचण, प्रा.श्रद्धा देशमुख, प्रा.सिद्धार्थ जगदाळे व प्रा.जुबेर शेख उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे आयोजन कॉम्प्युटर विभागामार्फत करण्यात आले होते.

**जागतिक महिला दिनानिमित्त सावेडी शिंदे मळा येथील**

# नामदेव मंदिरात प्रेरणादायी महिलांचा सन्मान



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावेडी शिंदे मळा येथील नामदेव मंदिरात महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात समाजातील प्रेरणादायी महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेव समाज ट्रस्ट चे अध्यक्षा प्रमिला दुमाटे होत्या.

यावेळी ''आदर्श माता पुरस्कार'' मिना संजोग मुळे यांना प्रदान करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून त्यांनी आपल्या मुलांना मोठे केले. आज त्यांच्या मुलांनी समाजात चांगली प्रगती केली असून कुटुंबाची परिस्थितीही सुधारली आहे. त्यांच्या संघर्षमय प्रवासाची माहिती त्यांच्या दोन्ही सुनांनी उपस्थितांसमोर मांडली. या प्रसंगी उपस्थितांनी त्यांच्या जिद्दीचे आणि मातृत्वाच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. तसेच ''प्रेरणास्थान पुरस्कार'' कुसुम बलभिम बगाडे यांना देऊन गौरविण्यात आले. २०१६ साली अर्धांगवायूचा तीव्र झटका आल्याने त्यांची प्रकृती अत्यंत खालावली होती. मात्र कुटुंबियांच्या सहकार्याने आणि स्वतःच्या जिद्दीच्या बळावर त्यांनी आजारावर मात केली.

# अक्षय कर्डिले यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य; दोषींवर तात्काळ कारवाईची मागणी

**कारवाई न झाल्यास डीएसपी चौकात रास्तारोकोचा इशारा**

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भाजपचे युवा नेते अक्षय कर्डिले यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी संदीप कर्डिले, गोविंद वाघ, रभाजी सुळ, अनिल कराडे, रावसाहेब कर्डिले, दत्ता तापकिरे, संभाजी पालवे, राहुल पानसरे, सागर बनकर, यशवंत पानमळकर आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, लोकनेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकाली निधनानंतर रिक्त झालेल्या २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांचा सर्वे करण्यात येत आहे. या सर्वे साठी ७९७१७५३३५२ व ७९७१८३१०६० या मोबाईल क्रमांकांचा वापर करण्यात आला आहे. या क्रमांकांवरून मतदारसंघातील अनेक मतदारांना व्हॉईस कॉल आले होते.

मात्र या दोन्ही क्रमांकांच्या ट्रूकॉलर आयडीवर लोकनेते स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे चिरंजीव तथा युवा नेते अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या नावाने अतिशय आक्षेपार्ह मजकूर टाईप करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे स्वर्गीय आमदार कर्डिले यांच्यावर प्रेम करणाऱ्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. हे कृत्य अत्यंत निंदनीय असून यामुळे मतदारसंघातील कार्यकर्ते व नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्यावर प्रेम करणारे आम्ही सर्व कार्यकर्ते या घटनेचा तीव्र निषेध करत आहोत. या प्रकारामागील संबंधित व्यक्तीचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच राहुरी, नगर व पाथर्डी तालुक्यातील गावागावातील वातावरण दूषित होणार नाही यासाठी पोलीस विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, येत्या दोन दिवसांत संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर कायदेशीर कारवाई न केल्यास स्वर्गीय आमदार कर्डिले यांच्यावर प्रेम करणारे सर्व कार्यकर्ते सोमवार दिनांक ९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता डीएसपी चौक, अहिल्यानगर येथे तीव्र स्वरूपाचे रास्तारोको आंदोलन करणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# येवलवाडीमढी यात्रेनिमित्त अशोकबाबा शिशूपाळ यांचे सिद्धेश्वर मंदिरात दर्शन

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पैठण–** येवलवाडीमढीपैठण यात्रेनिमित्त सोमवार (दि. ९ मार्च २०२६) रोजी गुरुवर्य अशोकबाबा शिशूपाळ व त्यांच्या शिष्य परिवाराने पैठणचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर भगवान मंदिरात जाऊन भाविक वातावरणात दर्शन घेतले. यात्रेनिमित्त पैठण नगरीत मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असून विविध धार्मिक कार्यक्रमांनी परिसर भक्तिमय झाला आहे. अशा वातावरणात अशोकबाबा शिशूपाळ व शिष्य परिवार मंदिरात दाखल झाले. मंदिरात विधिवत पूजा-अर्चा करून त्यांनी श्री सिद्धेश्वर भगवानांचे दर्शन घेतले आणि सर्व भाविकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी मंदिर परिसरात उपस्थित भाविकांनीही दर्शनाचा लाभ घेतला. श्री फौजदार का. जाधव, आशिष पवार व



कुणाल गुरव यांनी अशोकबाबा शिशूपाळ व त्यांच्या शिष्य परिवाराचे स्वागत केले. दर्शनानंतर उपस्थित सर्वांचे त्यांनी आभार मानले. दरम्यान, यात्रेनिमित्त पैठणमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत असून विविध दिंड्या, भजन-कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांमुळे शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. अशोकबाबा शिशूपाळ यांच्या आगमनामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

## नाथषष्ठी यात्रेच्या पहिल्या दिवशी २५ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी घेतला पूरी- भाजी प्रसादाचा लाभ

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी



**पैठण–** संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रविवारी यात्रेच्या पहिल्याच दिवशी पैठण शहरात वारकरी भाविकांची मोठी गर्दी उसळली. शहरातील विविध ठिकाणी वारकरी भाविकांसाठी चहा, पाणी, फराळ तसेच भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक ठिकाणी सकाळपासूनच अन्नदानाच्या पंगती सुरू झाल्याने भाविकांनी मोठ्या उत्साहाने प्रसादाचा लाभ घेतला. वारकरी संप्रदायातील फडांवर सकाळी धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन झाल्यानंतर पंगती व महापंगतीद्वारे अन्नदान सुरू करण्यात आले. पैठणकरांनी वारकऱ्यांच्या पाहुणचारात कोणतीही कसर ठेवली नाही. ''साधू-संत येती घरी, तोचि दिवाळी-दसरा'' या परंपरेनुसार पैठणमधील सर्वधर्मीय नागरिक शेकडो वर्षांपासून नाथषष्ठी यात्रा महोत्सव काळात वारकऱ्यांची सेवा करत आहेत. दरम्यान, पैठण येथील कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ व अभ्यासक श्री. रामेश्वर सूसे यांनी शहरातील कमानीजवळ आपल्या 'कृषी जगत' व मित्रपरिवाराच्या सहकार्याने आठ वर्षांपूर्वी वारकरी भाविकांसाठी अन्नदानाचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारचा प्रसाद दिला जातो. यंदा यात्रेच्या पहिल्याच दिवशी गरमागरम पूरी-भाजी प्रसादाचा लाभ २५ हजारांहून अधिक वारकरी भाविकांनी घेतला. हा अन्नदानाचा उपक्रम सलग तीन दिवस सुरू राहणार असून मोठ्या संख्येने भाविक त्याचा लाभ घेत आहेत.

# राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या स्मृतिदिना निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीर



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्यास्मृतिदिना निमित्त सध्या आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये जैन सोशल फेडरेशनच्या माध्यमातून विविध आजारावरील मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रविवारी सर्व प्रकारच्या कॅन्सरवरील आरोग्य तपासणी व उपचारविषयी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले .हे शिबीर स्व.तुळसाबाई ,स्व.पनालालजी,स्व. केशरमलजी बोगावत व.परिवार (धामणगाववाला ) यांच्या स्मरणार्थ बोगावत परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.या शिबिराचे उदघाटन उद्योजक संतोषजी बोगावत यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले.याप्रसंगी बोगावत परिवारातील सदस्य सतीशजी,शरदजी,सुनिलजी,साधनाताई,व परेशजी बोगावत तसेच सतीश लोढा,सुभाषजी मुनोत,वसंत चोपडा,डॉ.वसंत कटारिया,आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या सुरवातीला वैधकीय अधिकारी डॉ. आशिष भंडारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले .डॉ.वसंत कटारिया यांनी प्रास्ताविक करून राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराजांच्या ''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा''या विचारधारेला अनुसरून या हॉस्पिटलच्या माध्यमातून हे रुग्णसेवेचे कार्य अविरत सुरु असून हजारो गरजू ,गरीब रुग्ण या सेवेचा फायदा घेत आहेत.आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून अधिकाधिक महिलांनी या शिबिराचा फायदा घ्यावा असे आवाहन केले असे सांगून अश्या मोफत शिबिराच्या आयोजनासाठी अनेकांचे योगदान मिळत असते त्यांचे आभार व्यक्त केले.

या शिबिराचे आयोजक परिवारातील सतीशजी बोगावत यांनी याप्रसंगी जैन सोशल फेडरेशन च्या संचालकांचे अभिनंदन केले .अनेक वर्षांपासून अश्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचा लाखो रुग्णांनी फायदा घेतला असून अश्या शिबिरांसाठी,समाज उपयोगी अश्या पुण्यकर्माच्या कार्यासाठी आम्हाला मिळालेली हि संधी म्हणजे आम्ही आमचे परमभाग्य समजतो.व यापुढेही अश्या सामाजिक कार्यासाठी आम्ही सदैव तत्पर असू असे उद्गार काढले.

कॅन्सर तज्ज्ञ डॉ.अनिकेत शिंदे यांनी कॅन्सर चा सर्व जगात मोठा प्रादुर्भाव वाढत चालला असून तरुण वयातही आता या कॅन्सर चे प्रमाण वाढत आहे त्याबद्धल चिंता व्यक्त केली.या सर्व मागील कारण म्हणजे बदलणारी खाद्य संस्कृती,अति फास्ट फूड खाणे,व्यायामाचा अभाव,अति लठ्ठपणा,व्यसनाधीनता ताण-तणाव.दुर्लक्ष.मनातील भीती तंबाखूचे सेवन अशी अनेक कारणे कारणीभूत असून वेळच्या वेळी डॉक्टरांच्या तपासण्या करून वेळीच निदान करून घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

# केवळ गुगलवर अवलंबून राहून खरा विद्यार्थी घडणार नाही – मुस्कान तलरेजा

**विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला 'जीनियस गॅलरी'तून मिळाला मंच । सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाचा उपक्रम; विज्ञान, कला व इतिहासाचे आकर्षक प्रदर्शन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कल्पकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'जीनियस गॅलरी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत कला, भाषा – इंग्लिश, मराठी, हिंदी,गणित-विज्ञान, भूगोल-पर्यावरण आणि ऐतिहासिक वास्तूंच्या मॉडेल्सचे आकर्षक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रकल्पांमुळे शाळेचा परिसर सर्जनशीलता आणि नवोपक्रमाच्या वातावरणाने भारावून गेला.

या जीनियस गॅलरीचा शुभारंभ मुस्कान तलरेजा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गीता तांबे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना मुख्याध्यापिका कांचन पापडेजा म्हणाल्या की, जीनियस गॅलरी हे केवळ प्रकल्पांचे प्रदर्शन नसून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा, कुतूहलाचा आणि शिक्षणाचा एक उत्सव आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण () २०२० च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असा हा उपक्रम असून, विद्यार्थ्यांच्या समग्र विकासावर शाळेचा भर आहे. अनुभवात्मक शिक्षण, समीक्षात्मक विचारसरणी, नवोपक्रम आणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून दिसून येतो.

त्यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, सामाजिक अभ्यास, पर्यावरण जागरूकता आणि कला अशा विविध विषयांवर मॉडेल्स, प्रयोग आणि सर्जनशील प्रकल्प तयार करण्यासाठी मोठी मेहनत घेतली आहे. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञान मिळवले नाही, तर टीमवर्क, समस्या सोडविण्याची क्षमता आणि वर्गातील शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग कसा करावा हेही शिकवले जात असल्याचे स्पष्ट केले.

मुस्कान तलरेजा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, केवळ गुगलवर अवलंबून राहून खरा विद्यार्थी घडत नाही. विद्यार्थ्यांमध्ये गुगलपेक्षाही वेगवान बुद्धिमत्ता आहे, ती जागृत करण्याची गरज आहे. फक्त इंजिनिअर किंवा डॉक्टर होण्याच्या शर्यतीत धावण्यापेक्षा प्रत्येकाने स्वतःतील क्षमता ओळखून त्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याचे आवाहन त्यांनी केले. वेगळ्या कल्पनाशक्तीला चालना देऊन स्वतःचा वेगळेपणा सिद्ध करण्याचेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

गणित-विज्ञान व भूगोल-पर्यावरण प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करून आपली कल्पनाशक्ती आणि कौशल्याची झलक दाखवली. विद्यार्थ्यांनी कागदावर कुंचल्यातून साकारलेली चित्रे जिवंत भासत होती. तसेच गड-किल्ले, मंदिरे आणि विविध ऐतिहासिक वास्तूंची मॉडेल्सही तयार करण्यात आली होती.

प्रदर्शनात ज्वालामुखी, शहरातील प्रदूषणमुक्ती, वाहतूक कोंडीवरील उपाय, निसर्ग चक्र, ग्रहांची स्थिती, तारांगण, पाणी बचत, डीएनए मॉडेल, परमाणू संरचना, विद्युत लिफ्ट यांसारख्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी मॉडेल्सद्वारे सादर केले.

# सहकार चळवळीतील ज्येष्ठ नेते विठ्ठलराव तिरसे यांचे निधन

**मंजूर-कारवाडी परिसरात हळहळ; सहकार व सामाजिक क्षेत्रातील कार्याची आठवण**



कोपरगाव तालुक्यातील मंजूर गावचे सुपुत्र तसेच सहकार चळवळीतील ज्येष्ठ नेते म्हणून ओळख असलेले विठ्ठलराव सिताराम तिरसे (वय ७८) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच मंजूर, कारवाडी व परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली असून सहकार व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. परिसरात त्यांना सर्वजण प्रेमाने ''भाऊ'' या नावाने ओळखत असत. कडक व करारी स्वभाव, स्पष्टवक्तेपणा आणि तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे त्यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. विठ्ठलराव तिरसे यांनी सहकार चळवळीत अनेक वर्षे सक्रियपणे काम केले. ग्रामीण भागातील शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांना सहकार संस्थांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक आधार मिळावा, या उद्देशाने त्यांनी सातत्याने कार्य केले. ते गौतम सहकारी बँकेचे अनेक वर्षे संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात बँकेच्या प्रगतीसाठी तसेच सभासदांच्या हितासाठी त्यांनी अनेक सकारात्मक निर्णयांमध्ये सहभाग घेतला. तसेच ते सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते कर्मवीर शंकरराव काळे यांचे विश्वासू सहकारी म्हणूनही ओळखले जात होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सहकार क्षेत्रात काम करताना संस्थात्मक बळकटीसाठी सातत्याने प्रयत्न केले. याशिवाय बळवंतराव राजे-भोसले विविध कार्यकारी सेवा संस्था, मंजूर-कारवाडी या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात संस्थेच्या माध्यमातून सभासद व शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता आणि लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवण्यावर त्यांनी नेहमी भर दिला.

कडक पण न्यायी स्वभाव, करारी निर्णयक्षमता आणि लोकांशी जिव्हाळ्याने वागण्याची वृत्ती यामुळे परिसरात त्यांना विशेष मान होता. सहकार आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य नागरिकांच्या कायम स्मरणात राहील, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्यामुळे कुटुंबातील मोठ्या भावाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली होती. अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांनी आपल्या बहिणी-भावांची आर्थिक व कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पार पाडली. कुटुंबात शिस्त, कष्टाची सवय आणि समाजसेवेची भावना त्यांनी रुजवली. त्यामुळे तिरसे कुटुंबासाठी ते एक मजबूत आधारवड होते. त्यांच्या जाण्याने कुटुंबीयांवर तसेच नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून कुटुंबातून एक मायेचा आधारवड हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ठाणे जिल्ह्यात सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून कार्यरत असलेले शशिकांत तिरसे तसेच गौतम सहकारी बँकेचे संचालक श्रीकांत तिरसे हे त्यांचे सुपुत्र होत. नारायण, भागवत व पाराजी तिरसे यांचे ते बंधू होते.

त्यांच्या निधनाने मंजूर व परिसरातील सहकार व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून विविध राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच ग्रामस्थांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

■ संकलन – विशाल लोंढे
मो. ९७६७५१०२१७

# अधिकार, कर्तव्य आणि उपाययोजना'कायद्याचा मूलभूत पाया – माहिती आयुक्त भूपेंद्र गुरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''अधिकार, कर्तव्य आणि उपाययोजना हा कायद्याचा मूलभूत पाया आहे. ज्या वकिलास कायद्यातील त्रुटी व विसंगती अधिक चांगल्या प्रकारे समजतात तोच वकील यशस्वी होतो. त्यामुळे कायदा समजून घेण्यासाठी त्यासंदर्भातील न्यायनिवाडे आणि मूलभूत तत्त्वांचा बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन राज्याचे माहिती आयुक्त भूपेंद्र गुरव यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेज आयोजित एक दिवसीय खटलापूर्व पूर्वतयारी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सहसचिव मुकेशदादा मुळे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, समन्वयक प्रा. डॉ. अतुल मोरे, प्रा. विजयकुमार शिंदे, अँड. चंद्रकांत कातकाडे तसेच अधिक्षक हेमा कदम उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना मुकेशदादा मुळे म्हणाले की, ''प्रत्येक नागरिकाने स्वतःहून कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. वकिलांनी याबाबतीत विशेष जबाबदारीने वागून न्यायालयापुढे कर्तव्यभावनेने उभे राहणे आवश्यक आहे. आपल्या व्यवसायातील अगदी छोट्या-छोट्या बाबींकडे लक्ष देत वकिलांनी समाजहितासाठी काम करावे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत दिवसेंदिवस होत असलेल्या प्रगतीची माहिती दिली. या कार्यशाळेत राज्यभरातून एकूण २६२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी प्रा. डॉ. अतुल मोरे संपादित 'खटलापूर्व पूर्वतयारी' या विषयावरील कार्यशाळा पुस्तिकेचे प्रमुख अतिथींच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

प्रमुख अतिथींची ओळख प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. विजयकुमार शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या

# पहिली एआय सह्याने हृदयविकार शस्त्रक्रिया साईदीपसहयाद्री हॉस्पिटलमध्ये यशस्वी – डॉ. किरण दीपक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** साईदीपसह्याद्री मणीपाल हॉस्पिटल मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता एआय च्या साहाय्याने orbital Atherectomy ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली अशी माहिती हृदयविकार तज्ञ डॉ किरण दीपक यांनी दिली.

हृदयाच्या धामण्या मध्ये कॅल्शियम चे ब्लॉकेज दूर करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता च्या वापर करून जिल्ह्यातील पहिली हृदय शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली यामुळे हृदयाकडे जाणारा रक्त प्रवाह पूर्ववत करण्यास मदत मिळाल्याने रुग्णाच्या हृदयला होणारा धोका टळला या शास्त्रक्रिये साठी बंगलूरू येथील हृदयरोग तज्ञ डॉ दाविंदर सिंग चड्डा, डॉ श्रीधर बधे,डॉ किरण दीपक व त्यांचे सर्व सहकारी डॉक्टर्स व कॅथलॅब टीम यावेळी उपस्थित होती. साईदीपसहयाद्री मणीपाल हॉस्पिटल मधील अत्याधुनिक हृदयरोग विभाग ज्या मध्ये कृतिम बुद्धिमत्ता () चा वापर करून ही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. या पूर्वी बलून च्या साहाय्याने हृदयाची झडप बदलणे इत्यादी यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत असे डॉ किरण दीपक म्हणाले.

# राष्ट्रवादीला मिळाला दमदार आवाज : मोहनराव रोकडे जिल्हा प्रवक्ते

**खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने निवड जाहीर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे एकनिष्ठ कार्यकर्ते मोहनराव रोकडे यांची अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा प्रवक्तेपदी निवड जाहीर करण्यात आली आहे. पारनेर येथे झालेल्या पक्षाच्या नियोजित बैठकीत खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने ही घोषणा करण्यात आली.



मोहनराव रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी प्रामाणिकपणे जोडले गेले असून पक्षाच्या स्थापनेपासून त्यांनी संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले आहे. पारनेर तालुक्यातील दुर्गम तसेच आदिवासी भागात कार्यकर्त्यांना एकत्रित करून पक्षाचे विचार जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले आहे.

सर्वसामान्य जनतेचा नेता म्हणून ओळख असलेल्या रोकडे यांचा तालुक्यात तसेच जिल्ह्यात मोठा जनसंपर्क असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. खासदार निलेश लंके यांच्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी महत्त्वाचे नियोजन करत सक्रिय भूमिका बजावली होती.

# स्त्रीशक्तीला सलाम : श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत 'निपुण सखी' सन्मान सोहळा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक महिला दिनानिमित्त श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवनिर्वाचित नगरसेविका सौ गौरी बोरकर तसेच श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणी सदस्या सौ संध्या कुलकर्णी यांनी प्रमुख अतिथीपद भूषविले तसेच कार्यक्रम अध्यक्ष संस्थेचे सेक्रेटरी व प्राथमिक विभाग शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर होते.

यावेळी प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी प्रास्ताविकातून स्त्री ही कुटुंब व समाजाची भक्कम आधारस्तंभ असून आई हीच मुलांची पहिली गुरु असल्याचे सांगितले. निपुण भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांच्या मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान विकासासाठी मातांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. मुलांच्या शिक्षणात उत्साहाने सहभाग घेणाऱ्या माताच खऱ्या ''निपुण सखी'' असे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना गौरी बोरकर म्हणाल्या की एक शिक्षिका म्हणून काम करणे हा स्त्रीत्वाचा मोठा सन्मान आहे. मुलांच्या जडणघडणीत जितका सहभाग पालकांचा आहे तितकाच प्रशालेतील शिक्षिकांचा असतो.

संध्या कुलकर्णी यांनी देखील जागतिक महिला दिनाच्या औचित्याने केलेल्या कवितेचे सादरीकरण आपल्या मनोगतातुन केले व सर्वांची मने जिंकली.

याप्रसंगी संस्थेचे व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सदस्य स्वप्नील कुलकर्णी, सुनील जोशी, माध्य विभाग प्राचार्या वसुधा जोशी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाचे रंगत वाढली.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून सुरेश क्षीरसागर यांनी उपस्थित महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या व घरातील पुरुषदेखील महिलांना वेळोवेळी करत असलेल्या मदतीने हे महिलांना प्रत्येक क्षेत्रात पुढे जाणे सुकर होत आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी माध्य विभाग प्राचार्या सौ वसुधा जोशी तसेच महिला पालक सौ अमृता कुलकर्णी यांनी देखील आपले विचार मनोगतातून मांडले. यावेळी दोन्ही विभागाच्या सर्व महिला शिक्षिकांचा स्नेहसन्मान करण्यात आला. आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीत हातभार लावणाऱ्या व शिक्षण प्रक्रियेत सक्रिय असणाऱ्या निवडक महिला पालकांना याप्रसंगी प्रमुख अतिथींच्या हस्ते ''निपुण सखी'' सन्मानाने गौरविण्यात आले. अध्यक्ष परिचय वृषाली कुलकर्णी यांनी तर यादी वाचन प्राची देशमुख यांनी केले. आभार सुप्रिया डबीर यांनी मानले व सूत्रसंचालन योजना जपे यांनी केले.

(पान १ वरून)

## प्रभाग १७ मध्ये महिनाभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत, नगरसेवकांचा आंदोलनाचा इशारा

निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग १७ मध्ये गेल्या महिन्याभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. दूषित पाणी, पाणी सुटण्याच्या अनिश्चित वेळा, पाण्याला पुरेसा दाब नसने अशा सर्व प्रकारच्या समस्यांचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.पाणी सुटण्याची वेळ निश्चित नसल्याने तसेच अशुद्ध स्वरुपाचा पाणी पुरवठा होत असल्याने प्रभागातील नागरिकांचा पालिका प्रशासनावर प्रचंड प्रमाणात रोष निर्माण झालेला आहे.

येत्या सात दिवसात प्रभाग क्रमांक १७ मधील विस्कळीत झालेला पाणी पुरवठा व्यवस्थित न केल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता प्रभागातील नागरिकांसह आम्ही लोक प्रतिनीधी आपल्या दालनात बेमुदत धरणे आंदोलन करणार आहोत. आणि त्याने उद्धवणाऱ्या परिस्थितीला पुर्ण पणे मनपा. प्रशासन जबाबदार असेल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर नगरसेवक मनोज कोतकर, मयुर बांगरे, कमलताई कोतकर व आश्विनीताई लोंढे यांच्या सह्या आहेत.

## नेवासा नगरपंचायतीत उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचा सत्कार

या प्रसंगी नगरसेवक अनिल पवार, अंकुश म्हस्के, महेश अण्णा लोखंडे, कृष्णा परदेशी, प्रवीण सरोदे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी ॲड. धनंजय जाधव यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना ॲड. धनंजय जाधव यांनी नेवासा नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी व मान्यवरांनी केलेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने काम करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## नाथषष्ठी यात्रोत्सवाला प्रारंभ; पैठणमध्ये पाच लाख भाविकांची गर्दी

यांच्या जयघोषात वारकरी शहरात दाखल झाले. संत एकनाथ महाराजांच्या समाधी मंदिरात दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. यात्रोत्सवानिमित्त शहरातील प्रमुख रस्ते, घाट परिसर आणि मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेला आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने पाणी, स्वच्छता, आरोग्य व वाहतूक व्यवस्थेचे नियोजन केले आहे. दरम्यान, गोदावरी काठावरील वाळवंट परिसरात वारकऱ्यांच्या दिंड्यांचे मुक्काम सुरू असून भजन-कीर्तन, प्रवचन आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसर भक्तिमय झाला आहे. आगामी दोन दिवस नाथषष्ठी उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.

## ड्रग्स माफियांविरोधात आमदार काशिनाथ दाते यांचा विधानसभेत बुलंद आवाज

पोलिसांनी कारवाई करत एका व्यक्तीकडून १ किलो ५२ ग्रॅम वजनाचा सुमारे २ कोटी १० लाख रुपये किमतीचा मॅफेड्रोन (एमडी) जप्त केला आहे. पुढील तपासात हा अंमली पदार्थ पारनेर तालुक्यातील कोहोकडी येथील व्यक्तीकडून विक्रीसाठी घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार संबंधितांविरुद्ध शिरूर पोलीस स्टेशन येथे एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर पोलीस कर्मचाऱ्याने यापूर्वी जप्त केलेल्या मुद्देमालातील अंमली पदार्थ काढून त्याऐवजी मैदा भरल्याचे तपासात उघड झाले. या प्रकरणी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशन, अहिल्यानगर येथे स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. सध्या या गुन्ह्यातील पाच आरोपी न्यायालयीन कोठडीत असून पुढील तपास सुरू आहे.

राज्यात अंमली पदार्थांविरोधात कठोर भूमिका घेतली जात असून अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स () स्थापन करण्यात आली आहे. सन २०२५ मध्ये राज्यात १३४०.४१ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून ५२३.१७ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.